दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक सागर राणा अभोरे संपादक बडूभाऊ इंगोले
RNI No - MHMUL/25/A0788
वाशीम ■ रविवार दि. 27 जुलै 2025 ■ वर्ष : 2 ले ■ अंक : 75 ■ पाने : 4 ■ किंमत : 5 रूपये ■ Title code:- MAHMUL03935

# मुंबईकरांना पावसाचा दणका

## सखल भागात पाणी साचल्याने नागरिक त्रस्त; रस्ते, रेल्वे वाहतुकीवरही पावसाचा परिणाम

महाराष्ट्र जीत



**मुंबई :** जुलै महिना संपत आला तरीही जुलै महिन्यासारखा पाऊस अजून बरसला नाही, अशी चर्चा नागरिकांमध्ये होती. मात्र गेले काही दिवस पावसाने संततधार कायम ठेवली असून शनिवारी मुसळधार पावसाने मुंबईकरांना चांगलाच दणका दिला. शनिवार सकाळपासून पावसाची दमदार इनिंग सुरू असल्याने मालाड, कांदिवली, बोरिवली, दहिसर परिसरात सखल भागात पाणी साचले होते. तर अंधेरी सबवेमध्ये पाणी साचल्याने रस्त्याला नदीचे स्वरूप प्राप्त झाले होते. दमदार पावसाचा रेल्वे व रस्ते वाहतुकीवरही परिणाम झाला.

रेल्वे १० ते १५ मिनिटे उशिराने धावत असल्याने तिनही मार्गावरील प्रवाशांचे हाल झाले. रस्त्यावर पाणी साचल्याने मुंबईकरांना सुट्टीच्या दिवशीही वाहतूककोंडीला सामोरे जावे लागले. दरम्यान, शनिवारी समुद्राला ४.६७ मीटरची मोठी भरती आल्याने यावेळी महापालिका आणि पोलीस प्रशासनाकडून समुद्रकिनारी आलेल्या पर्यटकांना सुरक्षित घरी जाण्याचे आवाहन करण्यात आले. तर रविवारपर्यंत हवामान विभागाने मुंबई, ठाणे जिल्ह्यासाठी पावसाचा 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे. तसेच, मुसळधार पावसाच्या शक्यता लक्षात घेऊन पालिकेने आपली यंत्रणा सज्ज ठेवली असल्याची माहिती प्रशासनाने दिली. दरम्यान, शनिवारच्या पावसाला पाहून कित्येक मुंबईकरांना २० वर्षांनंतरही त्या प्रलयकारी पावसाची आठवण झाली.

मुंबई आणि आजूबाजूच्या परिसरात मागील पाच दिवसांपासून सलग दमदार पाऊस बरसत आहे. शनिवारी सकाळी संततधार आणि दुपारनंतर सरीने पाऊस पडतो आहे. आठवड्याच्या सुरुवातीपासून सलग पावसाने दमदार हजेरी लावल्याने सखल भागात पाणी साचले होते. सकाळपासून पावसाची संततधार असल्याने मालाड, अंधेरी, दहिसर, कांदिवली, बोरीवली, वांद्रे, दादर टीटी, वडाळा, सायन गांधी मार्केट, परळ, चेंबूर शेल कॉलनी, कुर्ला, मानखुर्द, घाटकोपर, भांडुप, मुलुंड, विक्रोळी आदी भागात पाणी साचले. तर अंधेरी सबवे पाण्याखाली गेल्याने येथील रस्त्याला नदीचे स्वरूप प्राप्त होते. सलग पडणाऱ्या जोरदार पावसामुळे मुंबईकरांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. शनिवारी प्रवाशांना एक ते दीड तास वाहतूककोंडींचा सामना करावा लागला. तर तिनही मार्गावरील रेल्वे सेवा विलंबाने धावल्याने प्रवाशांना प्रचंड गर्दीतून प्रवास करावा लागला. मुंबई महापालिकेचे कर्मचारी मागील पाच दिवसांपासून पाणी साचणाऱ्या ठिकाणी कार्यरत होते. पंप लावल्याने पाण्याचा निचरा वेळेत झाला.

### १० हजार कर्मचारी तैनात

हवामान विभागाने रविवारीही पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे. त्यामुळे पालिकेने आपली यंत्रणा सज्ज ठेवली असून सुमारे १० हजार कर्मचारी तैनात केले आहे, तर येत्या २४ तासात मुंबई शहर व उपनगरात आकाश ढगाळ राहणार असून काही ठिकाणी जोरदार, तर काही ठिकाणी अतिजोरदार पावसासह अधूनमधून ४० ते ५० किलोमीटर वेगाने प्रतितास वारे वाहण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी गरज असल्यास घराबाहेर पडण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### आज समुद्राला उधाण -

- मध्यरात्री – ४.११ मीटर लाटांची उंची
- दुपारी – १.५६ वाजता – ४.६० मीटर उंची

### २४ तासांच्या पावसाची नोंद

| | |
|---|---|
| शहर | → २९.५१मिमी |
| पूर्व उपनगर | → ८९.४४ मिमी |
| पश्चिम उपनगर | → ८१.४२ मिमी |

### पडझडीच्या घटना -

- जोरदार पावसामुळे शहरात ९, पूर्व उपनगरांत १० व पश्चिम उपनगरांत ८ अशा एकूण २७ ठिकाणी झाडे व फांद्या पडण्याच्या घटना घडल्या. यात कोणीही जखमी झाले नाही.
- पूर्व उपनगरात ४ व पश्चिम उपनगरांत १ अशा एकूण ५ ठिकाणी घरे व घरांच्या भिंती कोसळल्या. यात कोणीही जखमी नाही.

# बेकायदेशीर स्टॉल्सची पाठराखण करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करा

## हायकोर्टाचे पालिका आयुक्तांना आदेश

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** शहरातील एका गृहनिर्माण सोसायटीच्या बाहेरील फूटपाथवर बेकायदेशीर उभारलेल्या पानटपरी स्टॉलची पाठराखण करणाऱ्या पालिका अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी करा, असे निर्देश उच्च न्यायालयाने बृहन्मुंबई महापालिकेच्या आयुक्तांना दिले आहेत. संबंधित अनधिकृत स्टॉल तत्काळ हटवण्याचे आदेश देतानाच सहा वर्षांहून अधिक काळ त्या स्टॉलविरुद्ध कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी सुरू करण्याचे निर्देश हायकोर्टाने दिले आहेत.

निर्वाण गृहनिर्माण सोसायटीने दाखल केलेल्या याचिकेवर, न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. नोव्हेंबर २०१९ मध्ये पालिकेने बेकायदेशीर स्टॉलचे पाडकाम केले होते. त्यानंतर पुन्हा तो स्टॉल त्याच जागेवर उभा करण्यात आला. कोणताही वैध परवाना वा परवानगीशिवाय स्टॉलचे बांधकाम उभारले गेल्याचा आरोप गृहनिर्माण सोसायटीने याचिकेतून केला होता. त्याची गंभीर दखल घेत खंडपीठाने संबंधित पालिका अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

१७ जुलै २०२३ रोजीच्या तपासणी अहवालात बेकायदेशीर स्टॉल एका फूटपाथवर उभारला गेल्याचे म्हटले होते. त्या स्टॉलधारकाने आरोग्य आणि व्यापार हे दोन्ही परवाने मिळवले नव्हते, असे त्या तपासणी अहवालातून उघड झाले होते. याबाबत खंडपीठाने कठोर भूमिका घेताच पालिकेने स्टॉलवर कारवाई करणार असल्याची सारवासारव केली.

२३ जुलै २०२५ रोजी पालिका कायद्यांतर्गत स्टॉलधारकाला तो स्टॉल स्वेच्छेने हटवण्यासाठी ४८ तासांची नोटीस बजावण्यात आली होती. त्याची नोंद घेत खंडपीठाने पालिका प्रशासनाला कार्यवाहीचा अहवाल ४ सप्टेंबर २०२५ पूर्वी सादर करण्याचे आदेश देत याचिकेची सुनावणी २९ जुलैला निश्चित केली.

### फूटपाथचा वापर खासगी फायद्यासाठी नाही


फूटपाथवरील अतिक्रमणावरून न्यायालयाने पालिका प्रशासन आणि अतिक्रमणकर्त्यांची चांगलीच कानउघाडणी केली. फूटपाथ ही सार्वजनिक जागा आहे. ही जागा पादचाऱ्यांच्या वापरासाठी आहे. या जागेचा खासगी फायद्यासाठी वापर केला जाऊ शकत नाही, अशा बेकादेशीर स्टॉलला वीज कनेक्शन कसे दिले? पालिका अधिकाऱ्यांनी यापूर्वी स्वतःहून कारवाई का केली नाही? असा प्रश्नांचा भडीमार न्यायालयाने केला. अशा अराजकतेला परवानगी देता येणार नाही, असे स्पष्ट करत खंडपीठाने पालिका आयुक्तांना वॉर्ड अधिकारी, सहाय्यक आयुक्त व संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे निर्देश दिले.

# नाहूरमध्ये नवीन पथदिवे बसवणार

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** गोरेगाव-मुलुंड जोड रस्ता प्रकल्पांतर्गत नाहूर रेल्वे स्थानकाजवळील मार्गासह रस्ते पुलाचा विकास केला जात आहे. या मार्गाच्या विकासादरम्यान या परिसरातील ६० पथदिवे काढून टाकण्यात आले होते. त्यामुळे या भागात अंधार पसरला होता. यासाठी, नव्याने बांधण्यात आलेल्या मार्गावर नवीन पथदिवे बसवण्यात येणार आहेत. यासाठी मुंबई महापालिका पथदिव्यांची रक्कम महावितरण कंपनीला अदा केल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली.

गोरेगाव-मुलुंड जोड रस्ता प्रकल्पांतर्गत नाहूर रेल्वे स्थानकाजवळील रस्त्यावर पथदिवे नसल्याने रात्रीच्या वेळेस पायी जाणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत असल्याची बाब मुलुंडचे आमदार मिहिर कोटेचा यांनी मागील हिवाळी अधिवेशनात उपस्थित केली होती. त्यावर पालिकेने यावर तत्काळ तोडगा काढावा, असे निर्देश अध्यक्षांनी महापालिका आयुक्तांना दिले होते. त्यानुसार प्रकल्प रस्त्यांच्या विस्तारीकरणाच्या कामामध्ये व तसेच गोरेगाव-मुलुंड जोड रस्त्याच्या उड्डाणपुलाच्या बांधकामामध्ये बाधित होणाऱ्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे पथदिवे बदलून अन्य जागेमध्ये स्थानांतरण करण्यात येणार आहे, तर भांडुप विभागातील ६० पथदिवे अन्य जागेत लावण्यात येणार असून यासाठी महावितरण कंपनीने हे पथदिवे रूंदीकरणानंतर बाजूच्या जागेत हलवून नव्याने बसवण्याची तयारी दर्शवली आहे. यासाठी महापालिकेच्या वतीने महावितरण कंपनीला ४३ लाख ७४ हजार रुपयांची रक्कम अदा करण्यात आली आहे. यामुळे या परिसरात लवकरच नवीन पथदिवे बसवण्यात येणार आहे.



### असा विकसित होणार गोरेगाव-मुलुंड जोड रस्ता

गोरेगाव–मुलुंड जोड रस्ता विकसित करण्यात येत आहे. या प्रकल्पातील पहिल्या टप्यात नाहूर रेल्वे स्थानकाजवळील मार्गासह सध्याच्या रस्ते उड्डाणपूल अर्थात रोड ओव्हर ब्रिजचे रूंदीकरण करण्यात येत आहे. तर दुसऱ्या टप्प्यात विकास आराखड्यानुसार सध्याच्या ३० मीटर रुंद रस्त्याची पूर्ण ४५.७० मीटरपर्यंत रूंदीकरण करण्यात येणार आहे. तर टप्पा तीन (अ) मध्ये उड्डाणपूल, एलिव्हेटेड रोटरीचे बांधकाम समाविष्ट आहे, ज्याची कामे सुरू आहेत. आता टप्पा तीन–ब मध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या खाली जुळ्या बोगद्यासह फिल्मसिटी, गोरेगाव येथे बॉक्स बोगद्याचाही समावेश आहे.

# अवकाळीचा ४ लाख शेतकऱ्यांना फटका

## शेतपिकांच्या नुकसानीपोटी ३७७ कोटींचा निधी मंजूर

**मुंबई :** राज्यात अवकाळी पावसामुळे १ लाख ८७ हजार ५३.२१ हेक्टर जमीन बाधित झाली. अवकाळी पावसाचा फटका शेतकऱ्यांना बसला असून सुमारे ३ लाख ९८ हजार ६०३ शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झाले असून नुकसानीपोटी ३७७ कोटी ४१ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले.

फेब्रुवारी २०२५ ते मे २०२५ या कालावधीत अवकाळी पाऊस व गारपीटमुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीपोटी छत्रपती संभाजीनगर विभागामधील ६७ हजार ४६२ शेतकऱ्यांच्या ३४ हजार ५४२.४६ हेक्टर बाधित क्षेत्रावरील पिकासाठी ५९ कोटी ९८ लाख २० हजार, पुणे विभागातील १ लाख ७ हजार ४६३ शेतकऱ्यांच्या ४५ हजार १२८.८८ हेक्टर बाधित क्षेत्रावरील पिकासाठी ८१ कोटी २७ लाख २७ हजार, नाशिक विभागातील १ लाख ५ हजार १४७ शेतकऱ्यांच्या ४५ हजार ९३५.१६ हेक्टर बाधित क्षेत्रावरील पिकासाठी ८५ कोटी ६७ लाख ८ हजार, कोकण विभागातील शेतकऱ्यांच्या ४ हजार ४७३.६९ हेक्टर बाधित क्षेत्रावरील पिकासाठी ९ कोटी ३८ लाख २४ हजार रुपये मदतीचा समावेश आहे.

### शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी - मकरंद पाटील

राज्यातील अनेक जिल्ह्यात फेब्रुवारी ते मे २०२५ या कालावधीत झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले होते. अवकाळी पावसामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे असून या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी या निधीस तातडीने मान्यता दिली असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव–पाटील यांनी सांगितले.

# गणेशोत्सवासाठी मूर्तिकारांना ९१० टन मोफत शाडू माती वाटप

**मुंबई :** मुंबई महापालिकेच्या पर्यावरणपूरक गणेशोत्सव या मोहिमेला यंदाही बळकटी देण्यात आली आहे. मुंबई महानगरात शाडू मातीच्या मूर्ती घडविण्याकरिता महापालिकेकडून मूर्तिकारांना दरवर्षीप्रमाणे यंदाही मोफत शाडू माती पुरविण्यात आली आहे. पालिकेकडून प्रत्येक परिमंडळात १०० टनासोबत आवश्यक तेवढी शाडू माती मूर्तिकारांना विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येत असून आतापर्यंत एकूण ९१० टन इतकी शाडू माती मोफत देण्यात आली आहे. तसेच पर्यावरणपूरक मूर्ती घडविणाऱ्या एकूण ९९३ मूर्तिकारांना मूर्ती घडविण्यासाठी मंडप परवानगी देण्यात आली आहे, अशी माहिती पालिका प्रशासनाकडून देण्यात आली.

मुंबई उच्च न्यायालयाने यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक करण्यासाठी पीओपीच्या मूर्तीवर बंदी घातली होती. त्यामुळे यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक साजरा करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सातत्याने नागरिकांना तसेच मूर्तिकारांना आवाहन करण्यात आले होते. तसेच ज्या मूर्तिकारांना आणखी शाडू माती हवी असेल, त्यांनी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर 'नागरिकांकरीता' या रकान्यामध्ये 'अर्ज करा' या रकान्यात 'मंडप (सार्वजनिक गणेशोत्सव/नवरात्रौत्सव/ इतर उत्सव)' या सदरामध्ये मागणी नोंदवावी, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने उपायुक्त (परिमंडळ-२) तथा श्रीगणेशोत्सवाचे समन्वयक प्रशांत सपकाळे यांनी केले आहे.

### सर्वाधिक वाटप कुठे?

सर्वाधिक शाडू मातीचे वितरण हे 'के पूर्व' विभागात झाले असून, या विभागात ९६ टन ६१५ किलो इतक्या शाडू मातीचे वाटप झाले. त्यापाठोपाठ 'जी उत्तर' विभागात ९१ टन २० किलो, 'पी उत्तर' विभागात ८२ टन ४५५ किलो, 'डी' विभागात ७४ टन २०० किलो; तर 'एफ दक्षिण' विभागात ७२ टन ६०० किलो शाडू माती वाटप करण्यात आल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली.

# 'बीबीए–बीसीए' अतिरिक्त सीईटीचा निकाल लवकरच

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** बीबीए, बीसीए आणि बीएमएस अभ्यासक्रमांच्या अतिरिक्त सीईटी परीक्षेचा निकाल ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जाहीर करण्यात येणार आहे. या अभ्यासक्रमांचा निकाल जाहीर होताच दुसऱ्या दिवसापासूनच प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ करण्यात येणार आहे. यामुळे निकाल आणि प्रवेशाच्या प्रतीक्षेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना लवकरच दिलासा मिळणार आहे.

राज्यात बीबीए, बीसीए आणि बीएमएस अभ्यासक्रमांच्या एक लाखांहून अधिक जागा उपलब्ध आहेत. मात्र या अभ्यासक्रमांकडे विद्यार्थांनी पाठ फिरवली आहे. त्यामुळे सीईटी सेलने यंदाही दोन वेळा सीईटी परीक्षा घेतली.

# दिंडोशी येथील विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा



**मुंबई :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा तसेच वह्या वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. शिवसेना ठाकरे गटाचे आमदार तसेच विभागप्रमुख सुनील प्रभू यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना शाखा ४४ च्या वतीने शाखाप्रमुख सुभाष धानुका यांनी दिंडोशी गणपती मंदिर येथे पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त दहावी, बारावी व पदवीधर विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा तसेच शालेय विद्यार्थ्यांना वह्या वाटपाचा कार्यक्रम आयोजित केला होता.

"शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त हा कार्यक्रम असून सामाजिक सेवा सप्ताह म्हणून आम्ही मतदारसंघात विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे," असे आमदार सुनील प्रभू यांनी सांगितले. या कार्यक्रमात १२५ विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

# खोदकाम करण्याची परवानगी मिळत नसल्याने नागरिक त्रस्त

**मुंबई :** पावसाळ्यात वीज केबल दोष आणि पाण्याच्या मुख्य पाईपलाइनमधील गळती, हमी कालावधीतील रस्त्यांवरील गॅस पाईपलाइनमधील गळती आणि हमी कालावधीत नसलेल्या रस्त्यांवरील गॅस पाईपलाइनमधील गळती दूर करण्यासाठी खोदकाम करून समस्या सोडवणे गरजेचे आहे. मात्र, पालिका प्रशासनाने खोदकाम करण्यास नकार दिल्याने नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याची माहिती काँग्रेस चे माजी नगरसेवक जावेद जुनेजा यांनी दिली. तसेच हमी कालावधीतील व हमी कालावधीत नसलेल्या रस्त्यांवर खोदकाम करण्यासाठी परवानगी मिळावी, अशी मागणी त्यांनी आयुक्तांकडे केली आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या खंदक धोरणानुसार, नव्याने बनविण्यात आलेल्या रस्त्यांवर खोदकाम करण्यासाठी पालिकेने परवानगी नाकारली आहे. परंतु मुंबईच्या रस्त्यांवर विद्युतपुरवठा करणाऱ्या भूमिगत केबल, पाणीपुरवठा करणाऱ्या भूमिगत जलवाहिन्या या किमान ६० ते ७० वर्षे जुन्या आहेत. तसेच भूमिगत गॅस पाईपलाइन्स या ठिकाणी असल्याने त्यांची होणारी दूरवस्था व त्यावर करायला लागणारी डागडुजी, याकरिता सदर ठिकाणी खोदकाम करणे गरजेचे आहे. तसेच सध्या काही विभागात दूषित पाणीपुरवठा होत असल्याने नागरिक त्रस्त आहेत. काही ठिकाणी पावसामुळे वीजपुरवठा वारंवार खंडित झाल्यामुळे नागरिकांना तासनतास अंधारात राहावे लागत आहे.

# आयटीआयमध्ये कारगिल विजय दिवस साजरा – लोढा

**मुंबई :** भारताचा गौरवशाली इतिहास पुढील पिढीपर्यंत पोहोचावा, यासाठी आम्ही महाराष्ट्रातील एक हजार शासकीय औद्योगिक संस्थांमध्ये कारगिल विजय दिनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे, असे कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले. कारगिल विजय दिनाच्या निमित्ताने क्रांतिकारक लहुजी साळवे आयटीआय लोणावळा येथे आयोजित कार्यक्रमात कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा बोलत होते. यावेळी समाजसेविका मंजू लोढा उपस्थित होत्या.

या उपक्रमामार्फत देशभक्ती, शौर्य आणि कृतज्ञतेचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा, हा आमचा उद्देश आहे. अनेक परकीय आक्रमणे आपल्या देशावर झाली, पण त्याचा सामना करून आपण प्रगतीच्या वाटेवर पुढे जात आहोत. कारगिल विजय दिनाच्या माध्यमातून आपला गौरवशाली इतिहास सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही हा उपक्रम आयोजित केला आहे.

## विद्यापीठाचा बँकर्स इन्स्टिट्यूट ऑफ रुरल डेव्हलपमेंट लखनऊसोबत करार

# मुंबई विद्यापीठात हवामान बदल, हवामान फायनान्सचे धडे

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** मुंबई विद्यापीठाच्या १०० वर्षांहून अधिक जुन्या आणि प्रतिष्ठित मुंबई स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पब्लिक पॉलिसीमधील (आधीचा अर्थशास्त्र विभाग) 'डॉ. एस. ए. दवे सेंटर फॉर रिसर्च अँड टीचिंग इन फायनान्स'च्या माध्यमातून आता विद्यार्थ्यांना हवामान बदल, हवामान वित्त (क्लायमेट फायनान्स) आणि शाश्वत विकासाचे धडे गिरवता येतील. या महत्त्वपूर्ण क्षेत्रांमध्ये प्रशिक्षण कार्यक्रम, प्रमाणपत्र आणि डिप्लोमा अभ्यासक्रम विकसित करण्यासाठी विद्यापीठाने नुकताच बँकर्स इन्स्टिट्यूट ऑफ रुरल डेव्हलपमेंट लखनऊसोबत सामंजस्य करार केला आहे.

या सामंजस्य कराराच्या अनुषंगाने बँकर्स इन्स्टिट्यूट ऑफ रूरल डेव्हलपमेंट संस्थेमार्फत हवामान वित्ताच्या विशिष्ट क्षेत्रातील प्रमाणपत्र अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले जाणार आहेत. विद्यार्थ्यांना लखनऊ येथील 'एक्सपेरिअन्शियल क्लायमेट चेंज लॅब'मध्ये शिकण्याचा लाभ मिळेल. तसेच, या विद्यार्थ्यांना बँकर्स इन्स्टिट्यूट ऑफ रूरल डेव्हलपमेंट, लखनऊ येथे इंटर्नशिप करण्याची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्याचबरोबर या दोन्ही संस्थांच्या माध्यमातून धोरणात्मक संवाद घडवून आणण्यासाठी या क्षेत्रातील प्रगत अभ्यास, संशोधन, परिसंवाद आणि परिषदांच्या स्वरूपात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल.

करारावेळी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र. कुलगुरू प्राचार्य अजय भामरे, बँकर्स इन्स्टिट्यूट ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे संचालक आणि विभागाचे माजी विद्यार्थी डॉ. निरूपम मेहरोत्रा, कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे, विभागाच्या संचालिका प्रा. मनिषा करने, दवे सेंटरच्या समन्वयक डॉ. माला लालवाणी आदी मान्यवर उपस्थित होते.

देशातील आर्थिक विचार आणि धोरण निर्मितीला आकार देणाऱ्या विद्वानांचा समृद्ध वारसा लाभलेले सर्वात जुने अर्थशास्त्र विभाग म्हणून मुंबई विद्यापीठातील मुंबई स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पब्लिक पॉलिसी विभागाची ओळख आहे. नुकत्याच या विभागाला यूडीआरएफ रँकिंगमध्ये प्रथम क्रमांकाने सन्मानित करण्यात आले आहे. या विभागाचे माजी विद्यार्थी डॉ. एस.ए. दवे, (युटीआय आणि सेबीचे माजी अध्यक्ष) यांच्याकडून मिळालेल्या शताब्दी वर्षाची भेट म्हणून डॉ. एस.ए. दवे सेंटर फॉर रिसर्च अँड टीचिंग इन फायनान्स स्थापन करण्यात आले आहे. बँकर्स इन्स्टिट्यूट ऑफ रूरल डेव्हलपमेंट लखनऊ ही राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड), देशाच्या विकास बँकेने पुरस्कृत केलेली एक स्वायत्त संस्था असून भारतातील आणि परदेशातील कृषी आणि ग्रामीण विकास बँकिंग क्षेत्रात प्रशिक्षण, संशोधन आणि सल्ला सेवा प्रदान करणारी एक प्रमुख संस्था म्हणून ती ओळखली जाते.

### क्लायमेट फायनान्स ही भविष्याची गरज - कुलगुरू



क्लायमेट फायनान्स हे केवळ भविष्यातील गरज नसून, आजच्या घडीला एक अपरिहार्य क्षेत्र बनले आहे. विद्यार्थ्यांना या उदयोन्मुख आणि महत्वपूर्ण क्षेत्रात ज्ञान आणि अनुभव मिळावा, यासाठी या दोन्ही संस्थांनी स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. यातून विद्यार्थी जागतिक हवामान बदलाच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी तयार होतील. तसेच देशाच्या शाश्वत विकासासाठी योगदान देऊ शकतील, असे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी सांगितले. त्याचबरोबर हवामान बदलाशी संबंधित आर्थिक आव्हानांवर मात करण्यासाठी आणि शाश्वत भविष्याकडे वाटचाल करण्यासाठीही या कराराचे महत्त्व अधोरेखित होणार आहे.

दैनिक
# महाराष्ट्र जीत
रविवार दि. २७ जुलै २०२५



## संपादकीय

# देवेंद्र फडणवीस, तुमची अंडी-पिल्ली आवरा !

अक्कलकोट येथे संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रविण गायकवाड यांच्यावर भाजपाच्या दिपक काटे नावाच्या गुंडाने जमाव जमवत शाईफेक व हल्ला करण्याचा प्रयत्न केला. हा काटे पोलिस रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. त्याच्यावर गंभीर गुन्हे आहेत. महसुलमंत्री बावनकुळे यांचा तो निकटवर्तीय आहे. तसेच भाजपाचा विद्यमान पदाधिकारी आहे. प्रविण गायकवाड यांच्यावरील हल्ला ही घटना अतिशय निंदनीय व निषेधार्ह आहे. प्रविण गायकवाड यांनी संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून खुप चांगले काम केले आहे. हजारो मुलांच्या हाताला रोजगार मिळवून दिला आहे. अनेकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले आहे. हजारो लोकांचे प्रबोधन करत त्यांच्यात शिव, शाहू, फुले व आंबेडकरांचा विचार रूजवण्याचे मोठे काम केले आहे. त्यांच्यासारख्या विवेकी माणसावरचा हल्ला हा केवळ त्यांच्यावरचा नाही तर तो शिव, शाहू, फुले, आंबेडकरांना प्रमाण मानना-या, संविधानावर विश्वास ठेवणा-या प्रत्येक कार्यकर्त्यावरचा आहे. ते अक्कलकोट येथे एका कार्यक्रमाला गेले असताना हा प्रकार घडला. गेल्या काही दिवसात भाजपाच्या वळचणीला असलेली किंवा पाळीव असलेली अंडी-पिल्ली खुपच मस्तावली आहेत. देशात कायद्याचे राज्य आहे अशी त्यांची मानसिकताच राहिली नाही. केंद्रात सत्ता आमची व राज्यातही आमचीच. त्यामुळे आमचं कोण काय वाकडं करणार ? या घमेंडीने अनेकजण मस्तावले आहेत. राज्यात त्यांचा अक्षरशः उतमात सुरू आहे. महाराष्ट्राचा या लोकांनी पुरता युपी-बिहार करून टाकला आहे. गेल्या काही दिवसातल्या घटना पाहिल्यावर याची जाणिव होते. या सगळ्या बांडगुळांना सत्तेचे पाठबळ आहे. या तथाकथीत बांडगुळांचा मसिहा देवाभाऊ आहे. त्यांच्याच जोरावर हे सगळे मस्तावले आहेत. आम्ही काहीही केले तर आमच्या पाठीशी देवाभाऊ आहे. आमचं कुणच काय वाकडं करू शकत नाही असा त्यांचा समज आहे. भाजपाचे काही मंत्री व आमदार असं जाहिरपणे बोलत आहेत. गेल्या काही दिवसात या सगळ्या चमच्यांनी, अंडी-पिल्ल्यांनी देवेंद्र फडणवीसांचा 'देवाभाऊ' केला आहे आणि याच देवाभाऊच्या जीवावर हे सगळे मस्तावले आहेत. कुणीही मंत्री, आमदार उठतो, काहीही बोलतो. संविधानाला, कायद्याला फाट्यावर मारत समाजात तेढ वाढवणारी, जातीय विद्वेष वाढवणारी भाषा वापरतो आहे.

देवेंद्र फडणवीसांच्या वळचणीला असणारे तर खुपच बेफाम आणि बेफाट झाले आहेत. सत्तेच्या मग्रुरीतूनच भाजपेयी गुंडाची राज्यभर दादागिरी सुरू आहे. इंद्रजीत सावंतांना धमक्या देणारा, शिवरायांना कसेही बोलणारा कोरटकर, शिवरायांच्या बाबतीत अवमानास्पद बोलणारा भिक्कारचोट राहूल सोलापुरकर असे अनेक नग आणि त्यांची बदमाशी महाराष्ट्र पाहतो आहे. जेष्ठ पत्रकार चित्रलेखाचे संपादक महाराव सरांच्या कार्यालयात घुसून त्यांना झुंडशाहीने माफी मागायला लावणारे, आता प्रविण गायकवाडांच्या अंगावर शाई टाकत त्यांच्यावर हल्ला करणारे चेहेरे कदाचित वेग-वेगळे असतीलही पण त्यांना प्रसवणारी व त्यांना स्तनपान करणारी एकच माता आहे. तिच्या जोरावरच हे सगळे मस्तावले आहेत. कमळीच्याच पदराखाली हे सगळे नग दडताना दिसतात. कमळीच यांना सत्तेच स्तनपान करते. कमळीच यांना वाचवते. त्यामुळे हे सगळेच मस्तावले आहेत. विरोधकांना जीवंतच ठेवायचे नाही असा मनसुबा त्यांचा दिसतो आहे. कदाचित त्यासाठीच हे हल्लासत्र, दादागिरी सुरू आहे. हल्ला करताना तो प्रविण गायकवाड, महाराव सर अशांच्यावर केला तर बाकीचे आपोआप भेदरतील. सेनापती पडला की सैन्य सैरावैरा पळते. सैन्याचा पराभव करायला जास्त वेळ लागत नाही. ते मानसिकृष्ट्या खचते. त्याचे मनोबल रहात नाही. हा मानसशास्त्रचा विषय आहे. कदाचित यासाठीच ते प्रविण गायकवाड यांच्या सारख्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करत असतील. त्यांच्यावर हल्ला केला की बाकीचे आपोआप पळतील असा त्यांचा समज असावा. देवाभाऊचा आणि कमळीचा असा समज असेल तर ते मुर्खाच्या नंदनवनात वावरत आहेत. सगळेच लोक बदनामीला, जेल-तुरूंगाला व मरणाला भीत नाहीत. "रणफंदीची जात आमुची कोण आम्हा भयभीत करी ?" या बाण्याने जगणारे खुप असतात. विशेष म्हणजे महाराष्ट्राच्या मातीचे तेच वैशिष्ठ्य आहे. या मातीत गवताला भाले फुटतात हा इतिहास आहे. अशोक चव्हाण, अजित पवार अशा चार-दोन घोटाळेबाज नेत्यांनी व त्यांच्या काही चेले-चपाट्यांनी शेपट्या घातल्या म्हणजे अवघा महाराष्ट्र झुकला असे होत नाही. महाराष्ट्राचा आजवरचा इतिहास देवेंद्र फडणवीस विसरले की काय ? महाराष्ट्र अजून चवथाळलेला नाही. तोवर देवेंद्रजी तुम्ही तुमच्या अंडी-पिल्यांना आवरा. मराठी माणसाने आजवर भल्या-भल्यांची जिरवली आहे. त्यामुळे देवेंद्रजी या सगळ्या पिलावळींना तुम्हीच चाप लावा. संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रविण गायकवाड यांच्यावरचा हल्ला हा सहज घेण्यासारखा नाही. यापुर्वी महाराष्ट्राने नरेंद्र दाभोळकर, कॉम्रेड गोविंद पानसरे यांना गमावले आहे. या जातीयवाद्यांनीच त्यांचा बळी घेतला आहे. आत्ता वाट्टेल ते झाले तरी चालेल पण कुठला मोहरा गमावता कामा नये. "माणूस मारता येतो पण त्याचा विचार मारता येत नाही !" असे म्हंटले जाते पण हे बरोबर नाही. पानसरे अण्णा गेले, नरेंद्र दाभोळकर गेले चळवळ ठप्प झाली. त्यांचा विचार मेला नाही पण विचारांचा झपाटा मंदावला. त्यांचा जो आवाका होता तो संपला. त्यांचे काम मंदावले. परिणामी पुरोगामी विचाराचे, शिव, शाहू, फुले आणि आंबेडकरांच्या विचाराचे काम थांबले. त्यामुळे माणूस मेला तरी त्याचा विचार मरत नाही या भ्रमात कुणी वावरू नये. आपल्याला माणसं आणि त्यांचा विचार दोन्ही जपाव लागेल. समाजात हा विचार रूजवणारी प्रविण गायकवाड, महाराव सर, श्रीमंत कोकाटे किंवा या चळवळीत काम करणारे सगळेच बिनीचे शिलेदार जपले पाहिजेत. त्यांचे विचार जेवढे महत्वाचे आहेत तेवढेच ही माणसं महत्वाची आहेत. भारताच्या मातीत रूजलेला, बहरलेला गौतम बुध्दांचा धर्म या भडव्यांनी विचार परिवर्तानेे नाही संपवला. या देशात लाखो बौध्दांच्या कत्तली केल्या. जो धर्म, जो बुध्द अर्धे अधिक जग स्विकारते तोच धर्म आणि तोच बुध्द भारताच्या मातीतून अल्पसंख्य होतो याचे कारण काय ? याचा विचार सर्वांनीच केला पाहिजे. म्हणूनच एक एक माणूस जपला पाहिजे. विचारांची लढाई विचारनेच लढता येते. अविचाराची लढाई विचाराने लढताही येत नाही आणि जिंकताही येत नाही. विचारांचा किंवा प्रभावाचा विचार केला असता तर इथला, या मातीतला बुध्द व त्यांचा धम्म वैदिकांना कधीच संपवता आला नसता. या भडव्यांनी कत्तली करूनच तो संपवला. यांचा विचार प्रभावी नव्हता म्हणूनच त्यांना बौध्दांच्या कत्तली कराव्या लागल्या. बौध्द स्तुप पाडावे लागले, फोडावे लागले. अफगाणिस्तानात तिथल्या कट्टर मुस्लिमांनी बौध्द मुर्त्या फोडल्याचे हे सांगतात पण भारताच्या मातीत या भडव्यांनी वैदिक धर्माच्या वर्चस्वासाठी किती माणसं मारली ? किती स्तुप फोडले ? याचा हिशोब देतील काय ? म्हणूनच अविचाराच्या लढाईला त्याच भाषेत उत्तर द्यावं लागेल. शिव, शाहू, फुले आणि आंबेडकरांचा विचार प्रमाण माणणा-या लोकांनी सगळे मतभेद मातीत गाडून एक व्हायला पाहिजे. या क्रुर व कपटी जातीयवाद्यांना एकसंघपणे आव्हान द्यायला पाहिजे. संभाजी ब्रिगेडने मतभेद विसरून आपले तुकडे परत शिवले पाहिजेत. पुन्हा एकसंघ होत संघर्षाचा एल्गार केला पाहिजे. कारण ही लढाई केवळ विचारांची लढाई उरलेली नाही तर ती अस्तित्वाची लढाई आहे. सत्तेने बेफाट व बेफाम झालेल्या मस्तवाल सत्ताधा-यांच्या वेळप्रसंगी गचांडीला पकडावे लागले तर पकडावे लागेल आणि या प्रवृत्तींना धडा शिकवावा लागेल. नाहीतर रोज एकाला मारतील, जीवंत गाडतील. निषेध करायलाही लोक शिल्लक उरणार नाहीत.

**दत्तकुमार खंडागळे**
**संपादक**
**वज्रधारी, 9561551006**

# श्री किसनलाल नथमल गोयनका कला व वाणिज्य महाविद्यालयात मुलीसांठी आरोग्य जागृती चर्चासत्र संपन्न

महाराष्ट्र जीत

दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित श्री किसनलाल नथमल गोयनका कला व वाणिज्य महाविद्यालयात दि 26 जुलै रोजी मुलींसाठी एकदिवसीय आरोग्य जागृती चर्चासत्र घेण्यात आले. दि बेरार एज्युकेशन जनरल सोसायटीचे अध्यक्ष अड. मोतीसिंहजी मोहता, संस्थेचे मानद सचीव डॉ. पवनजी माहेश्वरी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रदीप येवले यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयाच्या अतंर्गत गुणवत्ता कक्ष (IQAC), महिला तक्रार निवारण समिती तसेच सखी सावित्री समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सदर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. उद्घाटन सत्राचे अध्यक्ष महाविद्यालयाचे




प्राचार्य, डॉ. प्रदीप येवले होते. या चर्चासत्राचे उद्घाटन कार्यकारीणी सदस्य डॉ. अजय कांत यांनी केले. आपल्या उद्धाटनपर मनोगतात त्यांनी आधुनिक काळातील बदलेला आहार आणि त्याचा आरोग्यावरील परिणाम याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. प्रदीप येवले यांनी आहार आणि उपवास यांचा आरोग्यावर होणारा परिणाम याबाबत आपले विचार मांडले. या उद्घाटन सत्रात व्यासपीठावर स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य श्री समीर जोहरापूरकर तसेच प्रमुख् वक्ता आहारतज्ञ कु. सेजल जोहरापूरकर या उपस्थित होत्या. चर्चासत्राच्या दुसऱ्या सत्रात आहारतज्ञ कु. सेजल जोहरापूरकर यांनी विद्यार्थ्यांनींनीसोबत प्रश्नोउत्तरांच्या माध्यमातून चर्चा केली. त्यांनी मुलींसाठी 'Period Positivity: Embracing Your Body's Natural Rhythm' मासिक पाळीची सकारात्मता - शरीराच्या नैसर्गिक प्रवृत्तीचा स्वीकार या विषयावर चर्चा केली. मासिक पाळीमध्ये किशोरवयीन मुलींना आहारात करावे लागणारे बदल, मासिक पाळीमध्ये करावे लागणारे व्यायाम, शरीराची देखभाल आणि आहार, आराम याबाबत त्यांनी मुलींना मार्गदर्शन केले. मासिक पाळी ही एक नैसर्गिक प्रवृत्ती असून यात मानसिक आणि शारीरिक बदलांचा आनंदाने स्विकार करुन जगावे असा संदेश त्यांनी विद्यार्थीनींना दिला. या एकदीवसीय चर्चासत्राचे संचालन महिला तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षा डॉ. अंजली बर्डे यांनी केले, प्रास्ताविक प्रा. दिपाली तायडे यांनी तर आभार डॉ. दिप्ती दाणी यांनी केले. कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थीनी आणि महिला प्राध्यापक उपस्थित होत्या. चर्चासत्राच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापकवृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# भांडुपच्या छत्रपती शिवाजी महाराज तलाव मार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य !





महाराष्ट्र जीत

**प्रशासनाचे दुर्लक्ष**

मुंबई महापालिका प्रशासनाचे मुंबई खड्डेमुक्त करण्याचे स्वप्न पुन्हा एकदा भंगले आहे असा आरोप सामाजिक कार्यकर्ते गणेश नारायण वराडे यांनी केला आहे. उपनगरातील सर्वात महत्त्वाचे ठिकाण असलेल्या भांडुप विभागात अनेक ठिकाणच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. दुचाकी वाहनचालकांना तर मोठी कसरत करावी लागत असून. भांडुप (प.) येथील छत्रपती शिवाजी महाराज तलाव मार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाल्याने पादचारी नागरिकांना आपला जीव मुठीत घेऊन रहदारी करावी लागत असल्याने लवकरात लवकर खड्डे बुजवण्यात यावेत अशी मागणी गणेश वराडे यांनी मनपा प्रशासनाकडे केली आहे.

# शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त नेत्ररोग निदान शिबीर ,आरोग्य निदान शिबीराचे आयोजन

### शिबिराचा लाभ घेण्याचे जिल्हा समन्वयक डॉ. सिद्धार्थ देवळे यांचे आवाहन

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रतिनिधी)**शिवसेना पक्ष प्रमुख तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त रविवारी (दि. २७) खासदार संजय देशमुख यांच्या काटा रोडवरील शेळके कॉम्प्लेक्स मधील जनसंपर्क कार्यालयात आरोग्य शिबिर व रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे तरी गरजूंनी ह्या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन वाशीम येथील जन संपर्क कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.शिवसेनाप्रमुख हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे ह्यांचे सुपुत्र शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धवजी बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय देशमुख यांच्या वाशीम येथील काटा रोडवरील शेळके कॉम्प्लेक्स मध्ये असलेल्या जनसंपर्क कार्यालयात वाशिम जिल्ह्यातील गरजु रुग्णांसाठीभव्य नेत्ररोगनिदान मोफत शिबिर शिबिर व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदरहु रविवार दि. २७ जुलै २०२५ रोजी दु. १२ ते २ पर्यंत राहणार आहे. या शिबिराचे उद्‌घाटन वाशिम जिल्हा रुग्णालयाचे शल्य चिकित्सक डॉक्टर अनिल कावरखे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. नेत्ररोग निदान शिबिरामध्ये प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ. मनिष पावसे, प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ. चंदन वाणी व जिल्हा सामान्य रुग्णालयाचे नेत्ररोग तज्ञ डॉ. अविनाश पुरी नेत्ररोगतज्ञ हे ह्यावेळी सेवा देणार आहेत. त्याचप्रमाणे सागर ऑप्टिकलचे शैलेंद्र जैन यांची सुद्धा प्रमुख उपस्थिती राहणार आहे. वाशिम येथील प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ तथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा समन्वयक डॉक्टर सिद्धार्थ देवळे यांच्या देवळे हॉस्पिटल येथे रुग्ण नोंदणी केल्या जाणार आहे.या शिवसेना दोन्ही शिबिराबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा सहसंपर्कप्रमुख डॉ. सुधिर कव्हर, शिवसेना जिल्हाप्रमुख सुरेश मापारी, शिवसेना जिल्हा संघटक गजाननराव देशमुख, शिवसेना लोकसभा संघटक कॅप्टन प्रशांत पाटील सुर्वे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे विशेष म्हणजे शिबिरामध्ये निदान झालेल्याच्या मोतीबिंदुवरील शस्त्रक्रिया जिल्हा सामान्य रुग्णालय, वाशिम येथे करुन देण्यात येणार आहे तसेच गरजु रुग्णांना चष्म्याचे वाटप करण्यात येईल. या शिबीराचे आयोजन वाशिम जिल्हा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे, युवासेना, युवती सेना महिला आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे तरी या शिबिराचा जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा समन्वयक डॉ सिद्धार्थ देवळे यांनी केले आहे.





# तोतया पोलिसांनी तरुणाला जंगलात नेले; फोन-पे द्वारे ६० हजारांची लूट.

### गोसेखुर्द धरण परिसरात वाढदिवस साजरा करणाऱ्या तरुणासोबत घडलेला प्रकार; अड्याळ पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल.

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी / भंडारा.**

**अड्याळ, :-** मैत्रिणीसोबत वाढदिवस साजरा करण्यासाठी गेलेल्या एका तरुणाला, आपण पोलीस असल्याचे भासवून चार अनोळखी इसमांनी जंगलात नेले. तेथे त्याला धमकावून त्याच्याच मोबाईलमधील फोन-पे अपद्वारे ६० हजार रुपये काढून घेऊन पळ काढल्याची धक्कादायक घटना गोसेखुर्द धरण ते किटाळी जंगल परिसरात घडली आहे. ही घटना मंगळवार, दि. २२ जुलै रोजी दुपारी घडली असून, याप्रकरणी अड्याळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, पवनी येथील घोडेघाट वॉर्डमध्ये राहणारा




फिर्यादी गौरव सुनील शेंडे (वय १८) हा दि. २२ जुलै रोजी दुपारी २ ते ४ वाजण्याच्या सुमारास आपल्या मैत्रिणीसोबत एम.एच. ३६ ए.क्यू. ०१३१ या क्रमांकाच्या मोटरसायकलने गोसेखुर्द धरण ओलांडून किटाळी जंगल परिसरात वाढदिवस साजरा करण्यासाठी गेला होता. यावेळी चार अनोळखी इसमांनी त्यांना अडवले. 'आम्ही पोलीस आहोत, तुमची माहिती घरी आई-वडिलांना कळवतो,' अशी धमकी देत त्यांनी गौरवला घाबरवले. 'आमच्यासोबत पोलीस स्टेशनला चला,' असे सांगून ते त्याला आणि त्याच्या मैत्रिणीला जवळच्या किटाळीच्या जंगलात घेऊन गेले. जंगलात पोहोचल्यावर आरोपींनी गौरवकडील मोबाईल हिसकावून घेतला. त्यातील फोन-पे अप उघडून त्यामधून ६०,००० रुपये स्वतःच्या खात्यात वर्ग करून घेतले आणि तेथून पळ काढला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच गौरवने थेट अड्याळ पोलीस स्टेशन गाठून घडलेला प्रकार सांगितला. गौरव शेंडे याने दिलेल्या तक्रारीवरून, ठाणेदार यांच्या आदेशाने अड्याळ पोलिसांनी अप. क्र. २०५/२०२५ नुसार भारतीय न्याय संहितेच्या कलम २०४, ३१९(२), ३(५) अन्वये चार अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, पोलीस उपनिरीक्षक चव्हाण हे पुढील तपास करीत आहेत. पोलीस पथक आरोपींचा कसून शोध घेत आहे. नागरिकांनी अशा प्रकारे कोणी पोलीस असल्याचे भासवल्यास सावध राहावे आणि तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मेहा येथील जलजीवन रस्त्याची दुरावस्था करणाऱ्या ठेकेदार शेखर काटोले यांचा परवाना रद्द करा.

### जी. प. मुख्याधिकारी यांच्या कडे निवेदनातून मेश्राम यांची मागणी

महाराष्ट्र जीत

**कारंजा प्रतिनिधी**

मेहा येथील जलजीवन मिशनच्या कामा करिता सन 2023_ 24 जी. प. शेष फंडातून 10 लाख रुपये निधी गावातील पाइपलाइन व नळ जोडणी करिता उपलब्ध करून त्या निधीचा कुठलाही उपयोग झाला नाहीअसा आरोप शिव सेना उबाटा किसान आघाडीचे हिल्हा उपाअध्यक्ष हरिश्चन्द्र मेश्रान यांनी केला आहे. या निधीमधून ठेकेदार शेखर काटोले यांनी गावातील आम रहदारीचा रस्ता खोदून निकृष्ट दर्जाची पाईप टाकून नळे लाऊन फेब्रुवारी 2025 मध्ये काम केले मात्र प्रत्यक्षात पाइपलाइन दाबण्याकरिता रस्ता खोदून ठेवला त्या रस्ताची डागदूजी दुरुस्ती अद्याप पर्यंत करून दिलेली नाही ज्यामध्ये जनावराच्या पाणी पिण्या करिता हरीचंद्र मेश्राम यांनी हौद बांधला त्या हौदाची पाइपलाइन सुद्धा शेखर काटोले यांनी तोड फोड केली त्यामुळे जनावराच्या पाणी पिण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. हरीचंद्र मेश्राम यांनी मुख्यकार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांच्या कडे तक्रार दाखल केली त्या तक्रारीवर सुनावणी घेऊन कार्यकारी अभियंता वानखडे उपविभागीय अभियंता शुभम ढोके व तक्रारदार हरिश्चन्द्र मेश्राम यांचे उपाठीत मुख्य कार्यपालन अधिकारी वाघमारे यांच्या उपस्थितीत सदरहू रस्त्याची डागदूजी दुरुस्ती 20 जून 2025 रोजी पर्यंत करून देण्याचे ठरले होते तत्कालीन मुख्यकार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांच्या आदेशामुळे ठेकेदार शेखर काटोले यांनी 2/3 ट्रॅक्टर मुरूम टाकून तात्पुरीत दुरुस्ती करून दिली. मुख्य कार्योपालन अधिकारी वैभव वाघमारे यांची बदली झाल्याने ठेकेदार यांनी त्या रस्त्याची दुरुस्ती करून देत नाही असे स्पष्ट उपविभागीय अभियंता शुभम ढोके यांना प्रत्यक्ष कार्यालयात भेटून ठेकेदार शेखर काटोले यांनी मी काम करून देत नाही स्पष्ट शब्दात सांगितले.

आम रहदारीचा रस्ता खोल वर खड्डे पडले असून पायदळ चालणे सुद्धा दुरापास्त झालेले आहे. अशा परिस्थितीत उपविभागीय अभियंता पाणी पुरवठा विभाग कारंजा यांनी ठेकेदाराला काम रस्त्याची दुरुस्ती हौदाची तोडलेली पाइपलाइन पूर्णतः केल्याशिवाय बिलाची रक्कम अदा करणे योग्य नाही मात्र काम अपूर्ण ठेवून बिलाचे रक्कम अदा केल्याने मेहा येथील जनतेला त्रास सहन करावा लागत आहे.17 जून 2025 व 30 जून 2025 आणि 24 जुलै 2025 असे तीन निवेदन मुख्यकार्यकारी अधिकारी जी. प. वाशिम यांना हरीचंद्र मेश्राम यांनी निवेदनातून दिलेली आहे 7 दिवसाच्या आत ठेकेदार शेखर काटोले यांनी मेहा येथील आम रहदारीचा रस्त्याची दुरुस्ती व हौदाची तोडलेली पाइपलाइन करून देण्यात यावी 7 दिवसात करून न दिल्यास त्या रस्त्यावर प्रवास करताना अपघात अथवा जीवित हानी झाल्यास ठेकेदार शेखर काटोले व उपविभागीय अभियंता शुभम ढोके यांच्यावर मनुष्य वदाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी निवेदनातून हरीचंद्र शिवसेना उपजिल्हा प्रमुख ( किसान आघाडी ) वाशिम हरिश्चन्द्र मेश्राम यांनी निवेदनातून मागणी केली आहे जोपर्यंत ठेकेदार व उपविभागीय अभियंता रस्त्याची डागदूजी करून देत नाही तोपर्यंत कायदेशीर पाठपुराव करण्याची करणार असल्याचे हरीचंद्र मेश्राम यांनी यांनी प्रसिद्धी दिलेल्या पात्रकातून कळविले आहे

# महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न.

महाराष्ट्र जीत

प्रतिनिधी भारत चव्हाण

सारकिन्ही,कौलखेड अकोला परिसरामध्ये या महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार साहेब यांच्या वाढदिवसाच्या औचित्य साधून महानगरात ओपन स्पेस ,,,,खुल्या जागेवर वृक्ष लागवड करून. वृक्षवल्ली आम्हा सोयरे . या म्हणीप्रमाणे आरोग्यांच्या दृष्टिकोनातून निसर्गातील वातावरण अती उत्तम आरोग्य दायी निरोगी सदैव राहो.या उदात हेतूने सन्माननीय उपमुख्यमंत्री अजित दादा पवार साहेब यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने कृष्ण नगरी कौलखेड अकोला येथे अकोला येथे दिनांक 23 /7/ 2025 रोजी दुपारी एक वाजता.1.00 वा आमदार अमोल दादा मिटकरी साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा माननीय अध्यक्ष बद्रूजमा भाई आणि अनेक मान्यवरा च्या प्रमुख उपस्थितीत आयोजक सुषमा संतोष राठोड जिल्हा उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अकोला यांनी आयोजित केला होता. कार्यक्रमाचे नियोजन गोपाल भाऊ ठाकूर यांनी केले होते संजय ठाकरे सौ सविता ठाकरे रवींद्र देशमुख सौ अर्चना देशमुख विजय कातखेडे सौ शारदा कातखेडे भाकरे काका हरीश जवंजाळ सौ इंदुताई जवंजाळ गजानन गावंडे भास्करराव सांगळे सौ वैशाली सांगळे सुधाकर जाधव महेश शर्मा सौ शारदा शर्मा भीमराव गावंडे राजेश फासे सौ फासे ताई श्री नवलकर साहेब मालती साहेब श्री डाबेराव श्री भारस्कर साहेब श्री खाडे साहेब गोपाल भांबेरे दिवाकर बानाईत सौ स्नेहा बानाईत विष्णू भाऊ लाखाडे सौ मुक्ता लाखाडे श्री काशिनाथ गजभिये सौ गजभिये श्री लवटे साहेब शुभांगी लवटे रवी भाऊ ठाकूर छोटू ठाकूर राजूभाऊ ठाकूर सौ सपना ठाकूर सौ राधा ठाकूर सौ कल्पना ठाकूर श्री गोपाल सिंह ठाकुर सौ कविता ठाकूर श्री सुभाष राऊत मनोज चोपडे सौ दिपाली चोपडे श्री राऊत साहेब श्याम वानखडे सौ जयश्री वानखडे संदीप तायडे सौ तायडेमालती ताई जाधव सौरव राठोड शुभम राठोड आशिष पवार सुषमा ताई माहोरे कुलदिप ठाकूर संकेत दादळे हरिष हातेकर. पियुष दामोदर प्रतिक वसु रोशन ठाकूर कार्यक्रमाचे आयोजन सुषमा राठोड आणि गोपाळ ठाकूर महाराणा पार्क कौलखेड अकोला अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सदर कार्यक्रम संपन्न करण्यात आला.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

१ २ ३ ४ ५ ६

## दिवा–CSMT लोकल सुरू करण्याच्या आंदोलनाला राष्ट्रवादी काँग्रेसचा पाठिंबा..!

महाराष्ट्र जीत

**विशेष प्रतिनिधी (नागेश पवार)**



दिवा - दिवा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (CSMT) लोकल सेवा सुरू करण्यासाठी अश्विनी अमोल केंद्रे या २० दिवसांपासून धरणे आंदोलनाला बसले असून आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) कडून जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे. ही मागणी सामान्य प्रवाशांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असून, दिवा परिसरातील नागरिकांना वेळेवर व योग्य रेल्वे सेवा न मिळाल्यामुळे त्यांना शारीरिक, मानसिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. दिवा स्टेशनं वरून लोकल सेवा सुरु करणे ही काळाची गरज आहे. आमचा पक्ष नेहमीच जनतेच्या पाठीशी ठाम उभा आहे. जर रेल्वे प्रशासनाने तातडीने दखल घेतली नाही, तर आम्ही पक्ष स्तरावरून पुढील आंदोलनात्मक भूमिका घेण्यास तयार आहोत," असे पक्ष पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. या आंदोलनाला राष्ट्रवादी काँग्रेसचे किरण ताटे अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी जनरल कामगार संघ, ज्योती निलेश पाटील महिला अध्यक्षा कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्र, लक्ष्मण पाटील उपाध्यक्ष कल्याण-डोंबिवली जिल्हा, दीपक मोहिते अध्यक्ष दिवा ब्लॉक यांनी अश्विनी केंद्रे यांच्या नेतृत्वात सुरू असलेल्या जनहिताच्या लढ्यात आमचे पूर्ण समर्थन असल्याचे म्हटले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) दिवा विभाग,ठाणे तर्फे या पत्रक देऊन या आंदोलनाला जाहीर पाठींबा असल्याचे जाहीर करण्यात आले.

# गोर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार-गोरसेना करणार, कुलदीप चव्हाण गोर सेना जिल्हा अध्यक्ष

महाराष्ट्र जीत

**/प्रतिनिधी भारत चव्हाण /** सारकिन्ही,हरित क्रांतीचे प्रणेते महाराष्ट्रचे महानायक वसंतराव नाईक(नायक)यांचे विचार समाजात पोहचावे तसेच बंजारा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व शाबासकी थाप पडावी या हेतूने गोरसेना संघटना बंजारा समाजाच्या वतीने सत्कार मेळावा घेण्यात येत आहे 27 तारीख बार्शीटाकळी येते होत आहे संपूर्ण 10 वी 12 वी मध्ये पास असणारे मुलांना या मेळाव्यात हजर व्हावे हा कार्यक्रम गुलाम नबी आझाद महाविद्यालय बार्शीटाकळी येथे पार पडणार आहे तसेच या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून रविकांत पवार बि,डी, ओ,पं,स, बार्शीटाकळी प्रविण धुमाळ पि,एस,आय, बार्शीटाकळी दादाराव पवार







पंचायत समिती सदस्य कातखेड, राजेश वझिरे तहसीलदार बार्शीटाकळी, गोपाल चव्हाण माजी पी एस आय सरपंच उमरदरी, अजबराव जाधव माजी सभापती, सुनील जाधव सेवा लिफ्टिंग कॉन्ट्रॅक्टर अकोला, मधुकर पवार प्राचार्य गुलाब नबी आझाद महाविद्यालय बार्शी टाकळी, दिलीप जाधव ए एन न्यूज, अशोक राठोड माजी सभापती पंचायत समिती बार्शीटाकळी, सतीश पवार सिंहासन जाधव भारत चव्हाण पत्रकार, गोकुळ राठोड, सत्कार मूर्ती, डॉक्टर अरविंद चव्हाण एमडी हृदयरोग तज्ञ अकोला, डॉक्टर विजय चव्हाण बालरोग तज्ञ अकोला, डॉक्टर अमित जाधव अस्थिरोग तज्ञ अकोला, डॉक्टर सुनील चव्हाण नेत्ररोग तज्ञ अकोला, या मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे गोरसेना चे सर्वच कार्यकर्ते रवींद्र जाधव कुलदीप चव्हाण अविनाश राठोड विकास जाधव कृष्णा चव्हाण शिवराज जाधव मनोर राठोड आतिश राठोड राहुल राठोड उपस्थित राहणार आहे

## कुत्र्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे नागरिक भयभीत

कारंजा : शहरातील विविध भागांमध्ये भटक्या कुत्र्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.
आनंदनगर, लक्ष्मीनगर, बिलालनगर, मेमन कॉलनी, के. एन. कॉलेज परिसर आणि जिया कॉलनी या भागांमध्ये कुत्र्यांची संख्या झपाट्याने वाढली असून काही ठिकाणी कुत्र्यांनी नागरिकांना चावा घेतल्याच्या घटना घडल्या आहेत. या घटनांमुळे नागरिक विशेषतः महिला, वृद्ध आणि शालेय विद्यार्थी प्रचंड भयभीत झाले आहेत. सकाळी आणि संध्याकाळी फिरण्यासाठी घराबाहेर पडणे धोकादायक बनले आहे. अनेक ठिकाणी मागणी केली आहे. कुत्र्यांचे टोळके रस्त्यांवर मुक्तपणे फिरताना दिसत आहेत. शहरातील लोकवस्ती असलेल्या भागांमध्ये कुत्र्यांच्या वाढत्या संख्येमुळे नागरिक त्रस्त झाले असून, त्यांनी पालिका प्रशासनाकडे तातडीने भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण आणण्याची गरज आहे यसह मोकाट जनावरे भर रत्यावर फिरत आहेत त्यामुके रात्यावरून जाणे दुरापास्त झाले आहे त्यामुके मोकाट कुत्र्याची व मोकाट जनवराचा बंदोबस्त करण्याची मंगणी शहरवासियांकडून होत आहे.

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे कर्तव्य तत्पर उप अभियंता विजयकुमार विसपुते यांचा गौरव

**डोंबिवली(गुरुनाथ तिरपणकर)** जनतेच्या समस्यांना प्राधान्य देऊन, त्या वेळीच सोडविणे, नागरीकांना होणाऱ्या त्रासापासून मुक्त करणे दक्ष नागरिक म्हणून देशासाठी काम करणे,हे आपले आद्य कर्तव्य आहे असे समजून गेली ३४वर्षे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकीच्या सेवेत असलेल्या निष्कलंक, प्रामाणिक, कर्तव्य तत्पर अधिकारी उप अभियंता श्री.विजकुमार विसपुते यांचा सेवा निवृत्ती पुर्व संध्येला नेहरु रोड बचाव संघर्ष समितीच्या वतीने नुकताच त्यांचा जाहीर नागरी सत्कार करण्यात आला.डोंबिवली सारस्वत कॉलनी येथे हा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.डोंबिवली भूषण, पद्मश्री सन्मानिय श्री.गजानन माने यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी महापालिका कार्यकारी अभियंता मनोज सांगवे,,त्यांचे सहकारी अवधूत मदन आणि नाख्ये उपस्थित होते.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.शिंदे यांनी केले व आभार प्रदर्शन सौ.मृदुला कुलकर्णी यांनी केले.यावेळी श्री.प्रभाकरन, इंगवले,जंगम,निषाद पाटील, श्रीपाद कुलकर्णी,सौ.श्रुती उरणकर आणि इतर महिला व जेष्ठ नागरिक उपस्थित होते.

## वाशिम येथील समता नगर मध्ये समता महिला मंडळाच्या वतीने ग्रंथ पटनास सुरुवात.

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रतिनिधी)** येथील समता नगर मधील समता महिला मंडळाच्या वतीने नुकतीच ग्रंथ पटनाच्या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली आहे तीन महिने चालणाऱ्या वर्षावासाच्या निमित्ताने महिला मंडळाच्या वतीने दिनांक 14 जुलै पासून सर्वोत्तम भूमिपुत्र गौतम बुद्ध या ग्रंथाचे वाचन शोभाबाई पडघान यांच्या निवासस्थानी सुरु करण्यात आले आहे या ग्रंथाचे वाचन प्रज्ञाताई नवघरे करीत आहेत या ग्रंथ वाचनाची वेळ संध्याकाळी आठ वाजून 30 ते रात्री 10 पर्यंतची आहे ग्रंथाची श्रवण करण्यासाठी परिसरातील महिला शोभाताई पडघान रामकोर् जाधव सुजाता अंभोरे कमला मोरे सुलोचना मोरे मंदा भारसाकळ मला घरडे साधना डोंगरे कल्पना गवई यमुना साबळे कविता जावळे, चमकाबाई खडसे ,जोशना कांबळे ,कुसुम सरकटे ,जयश्री सुरवे,किरण गायकवाड ,सिंधू जाधव ,जया गवई ,माया देवकते सुषमा पडघान,अलका गायकवाड, शालिनी गवई, रत्नमाला अवचार,बिजली ताजणे,वैशाली धुळधुळे, जिजाबाई भगत ,दीक्षा पाईकराव,नलिनीताई पाईकराव,शोभा खंडारे ,मीना पवार शांताबाई सुकेशनि अंभोरे, सविता डोंगरदिवे,संगीता वानखडे,संध्या वानखडे ,विशाखा जाधव ,नम्रता कांबळे,अर्चना शेंडे ,दुर्गा धुळधुळे, शालिनी अडागले, प्रमिला अडगळे ,निशा कहाळे लक्ष्मीबाई गुडदे सागर इंगळे, विजया इंगोले तसेच परिसरातील उपासक मारुती मोरे किसन पडघान दादाराव इंगोले दगडू धुळधुळे जनार्धन जाधव वैभव कांबळे केशव कांबळी मोतीराम ठोंबरे समाधान मैंकर दत्ता सरकटे कपिल कांबळे प्रवीण सरकटे दुर्योधन भारसाक ळे समाधान आवचार आदी महिला उ उपासिका व उपासक मोठ्या संख्येने उपस्थित असतात तरी सतत तीन महिने चालणाऱ्या या ग्रंथ वाचनाच्या कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांनी श्रवण करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन समाजसेवक माधव डोंगरदिवे यांनी केले आहे.







## उद्घाटनाच्या प्रतीक्षेत MRI मशीन बंद; रुग्ण महिलेचा जीव टांगणीला, माजी आमदारांचा घेरावाचा इशारा.

### शासकीय प्रोटोकॉलचा फटका गोरगरीब रुग्णांना; जिल्हा रुग्णालय प्रशासनाच्या असंवेदनशील कारभारावर संताप

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी / भंडारा.**



**भंडारा,** :- भंडारा जिल्हा रुग्णालयात कोट्यवधी रुपये खर्चून बसवण्यात आलेली अत्याधुनिक एमआरआय मशीन केवळ शासकीय उद्घाटनाअभावी धूळ खात पडून आहे. शासनाच्या या 'उद्घाटन प्रोटोकॉल'च्या हट्टापायी सुमित्रा नान्हे नावाच्या एका गरीब रुग्ण महिलेचा जीव टांगणीला लागला असून, प्रशासनाच्या या असंवेदनशील कारभाराविरोधात माजी आमदार चरण वाघमारे यांनी जिल्हा शल्यचिकित्सकांना घेराव घालण्याचा इशारा दिला आहे. जिल्हा रुग्णालयात गेल्या अनेक महिन्यांपासून एमआरआय मशीन बसवून पूर्णपणे तयार आहे. मात्र, शासनाकडून अधिकृत उद्घाटन न झाल्याने ही अत्यंत महत्त्वाची सेवा सुरू होऊ शकलेली नाही. परिणामी, जिल्ह्यातील गोरगरीब आणि गरजू रुग्णांना एमआरआय तपासणीसाठी हजारो रुपये खर्च करून खासगी रुग्णालयांमध्ये जावे लागत आहे, ज्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जात आहे. या शासकीय दिरंगाईचा थेट फटका डोंगरगाव येथील सुमित्रा नान्हे (वॉर्ड क्र. १३) या रुग्ण महिलेला बसत आहे. त्यांना तातडीने एमआरआय तपासणीची गरज असताना, रुग्णालयात मशीन उपलब्ध असूनही ती बंद असल्याने त्यांच्यावर उपचार करणे शक्य होत नाही. "शासनासाठी उद्घाटनाचे सोपस्कार महत्त्वाचे की रुग्णाचा जीव?" असा संतप्त सवाल चरण वाघमारे यांनी पत्रकार परिषदेत उपस्थित केला आहे. "एकीकडे मुख्यमंत्री न्यायालयाच्या इमारतीच्या भूमिपूजनासाठी जिल्ह्यात येत असताना, दुसरीकडे रुग्णसेवेसाठी अत्यावश्यक असलेल्या एमआरआय मशीनचे उद्घाटन जाणीवपूर्वक थांबवून ठेवले आहे," असा गंभीर आरोप वाघमारे यांनी केला. त्यांनी एक धक्कादायक माहिती उघड करताना सांगितले की, "रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी रुग्णालय प्रशासनाने काही काळासाठी ही मशीन सुरू केली होती. मात्र, उद्घाटनापूर्वीच सेवा सुरू केल्याच्या कारणावरून शासनाने जिल्हा रुग्णालयाला कारणे दाखवा नोटीस बजावली आणि ही सेवा तात्काळ बंद करण्यास भाग पाडले." या सर्व प्रकारामुळे संताप व्यक्त करत, "जर प्रशासनाने तातडीने एमआरआय सेवा सुरू करून सुमित्रा नान्हे यांना न्याय दिला नाही, तर आम्ही जिल्हा शल्यचिकित्सकांना घेराव घालू," असा थेट इशारा चरण वाघमारे यांनी दिला आहे. कोट्यवधी रुपयांची ही मशीन रुग्णांच्या सेवेसाठी आहे की केवळ नेत्यांच्या हस्ते उद्घाटनाची फित कापण्यासाठी, याचे उत्तर आता शासनाने द्यावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीलासहकार मंत्री यांनी दिली भेट.

वाशिम(प्रविण पट्टेबहादुर) आज वाशिम जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना माननीय नामदार बाबासाहेब पाटील सहकार मंत्री महाराष्ट्र राज्य यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती, वाशिम ला भेट दिली.आणि अमूल्य असे मार्गदर्शन केले त्या निमित्ताने या कार्यक्रमाला माननीय आमदार अमित भाऊ झनक, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती महादेवराव काकडे गुरुजी, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष चक्रधर भाऊ गोटे,उपसभापती गोवर्धन पाटील चव्हाण, अकोला वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक दिलीपराव जाधव, माजी सभापती दामू अण्णा गोटे, शिवसेना जिल्हाप्रमुख सुरेश भाऊ मापारी, गणेश उंडाळ,संजय शिंदे व कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव को वामनराव सोळंके तसेच वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक कर्मचारी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजूभाऊ चौधरी यांनी केले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महादेवराव काकडे गुरुजी यांनी केले.या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुभाषराव चौधरी यांनी केले.

# रोटरी क्लब ऑफ इंदापूर सेंट्रलतर्फे माजी सैनिकांचा सन्मान सोहळा

रोटरी क्लब ऑफ इंदापूर सेंट्रलने २६ व्या कारगिल विजय दिनाचे औचित्य साधून इंदापूर नगरपरिषद मैदानावर तालुक्यातील माजी सैनिक बांधवांचा सन्मान सोहळा अत्यंत गौरवपूर्वक पार पाडला. देशासाठी आपले जीवन समर्पित केलेल्या या शूरवीरांचा यथोचित सन्मान करणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमाचे आयोजन क्लबचे संस्थापक अध्यक्ष रो.ज्ञानदेव डोंबाळे आणि क्लब च्या सदस्यांनी केले होते. कार्यक्रमात उपस्थित असलेल्या माजी सैनिकांना फेटा बांधून, पुष्पहार अर्पण करून आणि शुभेच्छा देऊन सन्मानित करण्यात आले. अनेक माजी सैनिक मोठ्या संख्येने





या सोहळ्याला उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना रो.ज्ञानदेव डोंबाळे म्हणाले की, "प्रत्येक सैनिक हा परमेश्वरा इतकाच पूजनीय आहे. देशासाठी सेवा करणाऱ्यांचा सन्मान करणे हे केवळ सामाजिक कर्तव्य नसून राष्ट्रीय ऋण आहे. त्यांच्या बलिदानामुळेच आपण सुरक्षित आहोत, हे आपण सदैव लक्षात ठेवले पाहिजे." या सन्मान सोहळ्याला रोटरी क्लब ऑफ इंदापूर सेंट्रलचे सक्रिय सदस्य रो.समीर सूर्यवंशी, रो.तात्यासाहेब वाघमारे, जय इंस्टीट्युट ऑफ नर्सिंग चे रो.श्री.जयवंत नायकुडे सर आणि नर्सिंग कॉलेज च्या मुली तसेच युवा क्रांती प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष रो.प्रशांत शिताप रो.धरमचंद लोढा अस्लम शेख सचिन चौगुले तसेच रोटरी क्लब चे विविध पदाधिकारी आणि शहरातील अनेक मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमात देशभक्तीपर वातावरण निर्माण झाले होते आणि सर्वच माजी सैनिकांना उपस्थितांकडून उभे राहून टाळ्यांच्या गजरात सलाम करण्यात आला. रोटरी क्लब ऑफ इंदापूर सेंट्रल नेहमीच विविध सामाजिक उपक्रमांमध्ये अग्रेसर राहिला आहे. आरोग्य, शिक्षण, ग्रामीण विकास आणि राष्ट्रसेवा या क्षेत्रांमध्ये क्लबचे योगदान लक्षणीय आहे. कारगिल विजय दिनाचे औचित्य साधून माजी सैनिकांचा सन्मान करून क्लबने देशभक्तीचे आणि सामाजिक बांधिलकीचे एक उत्तम उदाहरण घालून दिले आहे.

## भंडारा पोलिसांची मोठी कारवाई: शालेय पोषण आहाराच्या तांदळाचा काळाबाजार उघड, १४.८३ लाखांचा मुद्देमाल जप्त

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी / हंसराज भंडारा.**

**भंडारा,** : - शाळेतील मुलांच्या तोंडचा घास पळवून शालेय पोषण आहाराच्या तांदळाचा काळाबाजार करणाऱ्या एका मोठ्या रॅकेटचा भंडारा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. जवाहरनगर पोलीस स्टेशन हद्दीत दहशतवाद विरोधी पथकाने केलेल्या धडक कारवाईत एका ट्रकमधून १०,५०० किलो तांदूळ जप्त करण्यात आला असून, याप्रकरणी ठेकेदारासह तिघांना अटक करण्यात आली आहे. तांदूळ आणि ट्रक असा एकूण १४ लाख ८३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश बैरागी यांच्या नेतृत्वाखालील दहशतवाद विरोधी पथक जवाहरनगर परिसरात पेट्रोलिंग करत असताना, खरबी-गौरी रोडवरील साईबाबा राईस मिलसमोर एक ट्रक (क्र. एम.एच. ४०/ए.के. २६९१) संशयास्पदरित्या उभा असल्याची गुप्त माहिती मिळाली. पथकाने तातडीने घटनास्थळी पोहोचून ट्रकचालक अनिल प्रभाकर रणदिवे (वय ३४, रा. मुंढरी/टोला, जि. गोंदिया) आणि ठेकेदार अमित विनायक वाघ (वय ३९, रा. नागपूर) यांची चौकशी



केली. तांदळाविषयी विचारले असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली आणि कोणतीही अधिकृत कागदपत्रे दाखवली नाहीत. पोलिसांनी ट्रकचालक अनिल रणदिवे याला विश्वासात घेऊन चौकशी केली असता, त्याने हा तांदूळ शालेय पोषण आहाराचा असल्याचे कबूल केले. ठेकेदार अमित वाघ याच्या सांगण्यावरून तो हा तांदूळ साईबाबा राईस मिलमध्ये आणल्याचे त्याने सांगितले. या माहितीची खातरजमा करण्यासाठी पोलिसांनी शिक्षण अधिकारी (प्राथमिक) रवींद्र सोनटक्के आणि विस्तार अधिकारी शिल्पा निखाडे यांना घटनास्थळी पाचारण केले. त्यांनी तांदळाची तपासणी करून तो शालेय पोषण आहाराचाच असल्याचे प्रमाणित केले. यानंतर पोलिसांनी पंचनामा करून प्रत्येकी ५० किलो वजनाची २१० तांदळाची पोती (एकूण १०,५०० किलो तांदूळ, किंमत ४,८३,००० रुपये) आणि १० लाख रुपये किमतीचा ट्रक असा एकूण १४,८३,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोलिसांनी ट्रकचालक अनिल रणदिवे, ठेकेदार अमित वाघ आणि साईबाबा राईस मिलचे मालक सुनील भावराव गिन्हेपुंजे (वय ४९, रा. खरबी) यांच्याविरोधात जवाहरनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. आरोपींविरुद्ध जीवनावश्यक वस्तू अधिनियम कलम ३, ७ आणि राष्ट्रीय सुरक्षा अधिनियम कलम ३३ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक नुरुल हसन आणि अपर पोलीस अधीक्षक निलेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पार पाडली.

**पोलीस अधीक्षकांचे नागरिकांना आवाहन**

जिल्ह्यातील कोणत्याही राईस मिलमध्ये अशा प्रकारे तांदळाची हेराफेरी किंवा काळाबाजार होत असल्याची माहिती असल्यास, नागरिकांनी पोलीस अधीक्षक, भंडारा यांच्या व्हॉट्सअप क्रमांक ८७९९८१८४१५ वर कळवावी. माहिती देणाऱ्याचे नाव आणि ओळख पूर्णपणे गुप्त ठेवली जाईल, असे आवाहन पोलीस अधीक्षक नुरुल हसन यांनी केले आहे.

## वाघाये महाविद्यालयात कारगिल विजय दिन उत्साहात संपन्न; शूरवीरांच्या बलिदानाला उजाळा

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी / हंसराज भंडारा.**

**लाखनी,** :- लाखनी स्व. निर्धन पाटील वाघाये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात कारगिल विजय दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. गणेश कापसे होते. याप्रसंगी शूरवीर सैनिकांच्या अदम्य शौर्याचे आणि बलिदानाचे स्मरण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. प्रमुख वक्ते म्हणून लाभलेले भारत सेवक सिद्धार्थ महाविद्यालय, कोंढा कोसरा येथील मराठी विभाग प्रमुख डॉ. दीपक साखरे यांनी आपले विचार मांडले. ते म्हणाले, "भारत आणि पाकिस्तान यांच्यात १९९९ साली झालेल्या कारगिल युद्धात आपल्या वीर जवानांनी प्राणांची आहुती दिली. त्यांच्या त्यागाचे आणि शौर्याचे स्मरण करणारा हा दिवस आहे. देशासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या त्या महान सैनिकांना कोटी कोटी प्रणाम." अध्यक्षीय भाषणात डॉ. गणेश कापसे यांनी सांगितले की, "कारगिल विजय दिवस प्रत्येक भारतीयाच्या मनात देशभक्तीची ज्योत प्रज्वलित करतो. पाकिस्तानी सैन्याने नियंत्रण रेषा (LOC) ओलांडून भारतीय हद्दीत घुसखोरी केली होती. त्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय सेनेने 'ऑपरेशन विजय' यशस्वी करून पाकिस्तानवर विजय मिळवला.





तेव्हापासून २६ जुलै हा दिवस संपूर्ण देशात कारगिल विजय दिवस म्हणून साजरा केला जातो."कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख डॉ. पुण्यशील टेंभूर्णे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. खाडे यांनी केले. यावेळी डॉ. शेंडे, डॉ. शहारे, डॉ. सिंह, डॉ. सार्वे, डॉ. ढोंगे, डॉ. करवाडे, प्रा. बोरकर, प्रा. वारंगणे, प्रा. तुषार डोंगरवार, प्रा. वलथरे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विलास वाघाये, उके, भोयर, दीपक वाघाये, बागडे, टेकाम, रहांगडाले, हनवतकर, शहारे आणि बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## ज्ञानेश्वर माऊली वारकरी शिक्षण संस्थेला समाधान महाराज शर्मा यांची भेट

## वारकरी शिक्षण संस्थेत माणूस निर्माणाचे कार्य केले जाते

### समाधान महाराज शर्मा यांचे भावोद्गार

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रतिनिधी)** महाराष्ट्र ही साधुसंत व महापुरुषांची भूमी आहे या भूमीमध्ये अनेक महान साधू संत आणि महापुरुषांनी जन्म घेतला असून त्यांनी त्यांच्या आयुष्यामध्ये कायम भरकटलेल्या समाजाला दिशा देण्याचे काम केले.असून बिघडलेल्या व वाईट मार्गाने गेलेल्या समाजाला चांगला मार्ग दाखवून समाजाचे व बिघडलेल्या माणसाचे हित जोपासण्याचे कार्य साधुसंत व महापुरुषांनी केले असून आज स्पर्धेच्या युगात युवा पिढी ज्या वाईट मार्गाने गेली असून व्यसनाधीनतेचे प्रमाण प्रचंड वाढले असून मोबाईल मुळे तरुण विद्यार्थ्यांचा शिक्षण अभ्यासक्रम व चांगल्या विचाराकडे दुर्लक्ष झाले असून वाईट विचारांचा प्रभाव त्यांच्यावर झालेला दिसतो. म्हणून आज तरुण पिढीला जर योग्य दिशा आणि मार्ग दाखवण्याचे कार्य जर कुठे होत असेल तर ते वारकरी शिक्षण संस्थेमध्येच आहे. म्हणून प्रत्येक गावात वारकरी शिक्षण संस्था निर्माण होण्याची अत्यंत गरज असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध शिवमहापुराण कथाकार कीर्तनकार ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांनी केले आहे.त्यांनी नुकतीच वांगी तालुका वाशिम येथील श्री संत ज्ञानेश्वर माऊली भागवत धर्म प्रसारक वारकरी शिक्षण संस्था वांगीला भेट देऊन त्यांनी वांगी येथील शिक्षण संस्थे संस्थेच्या कार्याचा पाहणी करून आढावा घेतला आणि संस्थेमध्ये अत्यंत चांगले शिस्तबद्ध संस्थेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रगती पाहून समाधान महाराज शर्मा यांनी समाधान व्यक्त केले. आणि संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवशंकर भोयर यांचा शाल श्रीफळ देऊन सन्मान केला.यावेळी संस्थेमध्ये शिकविले जाणारे विषय कीर्तन,भजन, संगीत,पखवाज,संस्थेचा परिपाठ शालेय अभ्यासक्रम या सर्व विषयावर सविस्तर करून संस्थेच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले. ज्यावेळी त्यांच्यासोबत त्यांचे मोठे बंधू संगीत अलंकार संतोष महाराज शर्मा संस्थेचे अध्यापक ह.भ.प. गजानन महाराज शिंदे भागवताचार्य ह.भ.प.सागर महाराज पारस्कर आकाश भोयर अजय भोयर किसन झाटे यांच्या सह वारकरी मंडळी उपस्थित होती.



## दिवा–CSMT लोकल सुरू करण्याच्या आंदोलनाला राष्ट्रवादी काँग्रेसचा पाठिंबा..!

महाराष्ट्र जीत

**विशेष प्रतिनिधी (नागेश पवार)**

**दिवा** - दिवा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (CSMT) लोकल सेवा सुरु करण्यासाठी अश्विनी अमोल केंद्रे या २० दिवसांपासून धरणे आंदोलनाला बसले असून आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) कडून जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे. ही मागणी सामान्य प्रवाशांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असून, दिवा परिसरातील नागरिकांना वेळेवर व योग्य रेल्वे सेवा न मिळाल्यामुळे त्यांना शारीरिक, मानसिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. दिवा स्टेशनं वरून लोकल सेवा सुरु करणे ही काळाची गरज आहे. आमचा पक्ष नेहमीच जनतेच्या पाठीशी ठाम उभा आहे. जर रेल्वे प्रशासनाने तातडीने दखल घेतली नाही, तर आम्ही पक्ष स्तरावरून पुढील आंदोलनात्मक भूमिका घेण्यास तयार आहोत," असे पक्ष पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

या आंदोलनाला राष्ट्रवादी काँग्रेसचे किरण ताटे अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी जनरल कामगार संघ, ज्योती निलेश पाटील महिला अध्यक्षा कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्र, लक्ष्मण पाटील उपाध्यक्ष कल्याण-डोंबिवली जिल्हा, दीपक मोहिते अध्यक्ष दिवा ब्लॉक यांनी अश्विनी केंद्रे यांच्या नेतृत्वात सुरु असलेल्या जनहिताच्या लढ्यात आमचे पूर्ण समर्थन असल्याचे म्हटले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) दिवा विभाग,ठाणे तर्फे या पत्रक देऊन या आंदोलनाला जाहीर पाठींबा असल्याचे जाहीर करण्यात आले.



## महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न.

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी भारत चव्हाण**

सारकिन्ही,कौलखेड अकोला परिसरामध्ये या महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार साहेब यांच्या वाढदिवसाच्या औचित्य साधून महानगरात ओपन स्पेस ,,,,खुल्या जागेवर वृक्ष लागवड करून. वृक्षवल्ली आम्हा सोयरे . या म्हणीप्रमाणे आरोग्यांच्या दृष्टिकोनातून निसर्गातील वातावरण अती उत्तम आरोग्य दायी निरोगी सदैव राहो.या उदात हेतूने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने कृष्ण नगरी कौलखेड अकोला येथे अकोला येथे दिनांक 23 /7/ 2025 रोजी दुपारी एक वाजता.1.00 वा आमदार अमोल मिटकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा माननीय अध्यक्ष बद्रूजमा भाई आणि अनेक





मान्यवरा च्या प्रमुख उपस्थितीत आयोजक सुषमा संतोष राठोड जिल्हा उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अकोला यांनी आयोजित केला होता. कार्यक्रमाचे नियोजन गोपाल भाऊ ठाकूर यांनी केले होते संजय ठाकरे सविता ठाकरे रवींद्र देशमुख अर्चना देशमुख विजय कातखेडे शारदा कातखेडे भाकरे काका हरीश जवंजाळ इंदुताई जवंजाळ गजानन गावंडे भास्करराव सांगळे सौ वैशाली सांगळे सुधाकर जाधव महेश शर्मा शारदा शर्मा भीमराव गावंडे राजेश फासे सौ फासे नवलकर साहेब मालती साहेब श्री डाबेराव भारस्कर साहेब खाडे साहेब गोपाल भांबेरे दिवाकर बानाईत स्नेहा बानाईत विष्णू लाखाडे मुक्ता लाखाडे काशिनाथ गजभिये सौं गजभिये लवटे साहेब शुभांगी लवटे रवी भाऊ ठाकूर छोटू ठाकूर राजूभाऊ ठाकूर सपना ठाकूर राधा ठाकूर कल्पना ठाकूर गोपाल सिंह ठाकुर कविता ठाकूर सुभाष राऊत मनोज चोपडे दिपाली चोपडे राऊत साहेब श्याम वानखडे सौ जयश्री वानखडे संदीप तायडे सौ तायडेमालती ताई जाधव सौरव राठोड शुभम राठोड आशिष पवार सुषमा ताई माहोरे कुलदिप ठाकूर संकेत दादळे हरिष हातेकर. पियुष दामोदर प्रतिक वसु रोशन ठाकूर कार्यक्रमाचे आयोजन सुषमा राठोड आणि गोपाळ ठाकूर महाराणा पार्क कौलखेड अकोला अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सदर कार्यक्रम संपन्न करण्यात आला.

## 'दिव्यातील लाखो घरांना अंधारात लोटले जाणे ही प्रशासनाची अपयशाची कबुली आहे! "- रोहिदास मुंडे

महाराष्ट्र जीत

**विशेष प्रतिनिधी (नागेश पवार)**

**दिवा:-** दिवा परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर नागरी वसाहती उभ्या राहत आहेत. हे सर्व प्रशासनाच्या डोळ्यासमोर घडले असून आज लाखो नागरिक तिथे वास्तव्यास आहेत. अशा परिस्थितीत जर ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त असे आदेश देत असतील की "अनधिकृत घरांना वीज आणि पाणी जोडणी देऊ नका", तर हा निर्णय केवळ अन्यायकारकच नव्हे तर अमानवी देखील ठरतो. मूलभूत सेवा नाकारणे म्हणजे नागरिकांना मरणाच्या दारात ढकलणे! पाणी आणि वीज या सेवा भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१ अंतर्गत येणाऱ्या "जीवनाच्या अधिकाराचा" एक अविभाज्य भाग आहेत. शासन व प्रशासन यांची जबाबदारी असते की नागरीकांना मूलभूत सुविधा पुरवाव्यात. जर एखादे बांधकाम अनधिकृत असेल, तर त्यावरील कारवाई वेगळी आहे, पण त्या घरात




राहणाऱ्या कुटुंबांना पाणी व वीज न देणे म्हणजे त्यांच्यावर दुहेरी अन्याय आहे.दिवा परिसरात लाखो घरं उभी राहिली, तेव्हा प्रशासन कुठं होतं? आज प्रश्न असा आहे की जर ही घरं अनधिकृत होती, तर त्या वेळी महानगरपालिका व शासनाचे अधिकारी झोपी का गेले होते? आता नागरिकांनी आपले आयुष्य उभे केल्यानंतर त्यांना वीज आणि पाणीपासून वंचित ठेवणे ही केवळ लाजिरवाणी गोष्ट आहे. यासंदर्भात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे यांनी महापालिके कडे मागणी केली आहे की दिवा परिसरातील सर्व घरांना त्वरित वीज व पाणीजोडणी द्यावी नागरिकांवर अन्याय करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अनधिकृत बांधकामांचे मूळ दोषी भ्रष्ट अधिकारी – **यांच्यावर गुन्हे दाखल करावेत** दिवा क्षेत्रासाठी विशेष नागरी सुधारणा प्रकल्प हाती घ्यावा

जनतेवर अन्याय करणाऱ्या धोरणांना आता आम्ही कंटाळलो आहोत. जर प्रशासनाने निर्णय मागे घेतला नाही, तर आम्ही मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर उतरण्याचा इशारा रोहिदास मुंडे यांनी दिला आहे. जनतेच्या मुलभूत हक्कांसाठी आम्ही लढू आणि मागण्या पूर्ण होईपर्यंत शांत बसणार नाही! असा इशारा मुंडे यांनी दिला आहे.

## गोर सेना करणार गोर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार- जिल्हा अध्यक्ष कुलदीप चव्हाण यांची माहिती.

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी भारत चव्हाण /** सारकिन्ही,हरित क्रांतीचे प्रणेते महाराष्ट्रचे महानायक वसंतराव नाईक(नायक)यांचे विचार समाजात पोहचावे तसेच बंजारा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व शाबासकी थाप पडावी या हेतूने गोरसेना संघटना बंजारा समाजाच्या वतीने सत्कार मेळावा घेण्यात येत आहे 27 तारीख बार्शीटाकळी येते होत आहे संपूर्ण 10 वी 12 वी मध्ये पास असणारे मुलांना या मेळाव्यात हजर व्हावे हा कार्यक्रम गुलाम नबी आझाद महाविद्यालय बार्शीटाकळी येथे पार पडणार आहे तसेच या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून रविकांत पवार बि,डी, ओ,पं,स, बार्शीटाकळी प्रविण धुमाळ पि,एस,आय, बार्शीटाकळी दादाराव पवार पंचायत समिती सदस्य कातखेड, राजेश वझिरे तहसीलदार बार्शीटाकळी, गोपाल चव्हाण माजी पी एस आय सरपंच उमरदरी, अजबराव जाधव माजी सभापती, सुनील जाधव सेवा लिफ्टिंग कॉन्ट्रॅक्टर अकोला, मधुकर पवार प्राचार्य गुलाब नबी आझाद महाविद्यालय बार्शी टाकळी, दिलीप जाधव ए एन न्यूज, अशोक राठोड माजी सभापती पंचायत समिती बार्शीटाकळी, सतीश पवार सिंहासन जाधव भारत चव्हाण पत्रकार, गोकुळ राठोड, सत्कार मूर्ती, डॉक्टर अरविंद चव्हाण एमडी हृदयरोग तज्ञ अकोला, डॉक्टर विजय चव्हाण बालरोग तज्ञ अकोला, डॉक्टर अमित जाधव अस्थिरोग तज्ञ अकोला, डॉक्टर सुनील चव्हाण नेत्ररोग तज्ञ अकोला, या मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे गोरसेना चे सर्वच कार्यकर्ते रवींद्र जाधव कुलदीप चव्हाण अविनाश राठोड विकास जाधव कृष्णा चव्हाण शिवराज जाधव मनोर राठोड आतिश राठोड राहुल राठोड उपस्थित राहणार आहे

## मातीशी नाळ असणाऱ्या व माणुसकी जपणाऱ्या डॉ वसंत दगडे यांना विश्वास पुरस्कार दिल्याचे समाधान - सचिव विरसिंह रणसिंग

**प्रतिनिधी. शामराव जगताप**

महाराष्ट्र जीत

**कळंब ता.** इंदापूर येथील विश्वासराव रणसिंग महाविद्यालयातील सभागृहात इंदापूर तालूका ग्रामविकास प्रतिष्ठान निमसाखर यांच्या वतीने देण्यात येणारा विश्वास गौरव २०२५ पुरस्कार वैद्यकीय क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल वालचंदनगर येथील सुप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ् डॉ.वसंत भगवानराव दगडे त्यांच्या सुविद्य पत्नी रीटा दगडे यांना संस्था अध्यक्ष आनंदी रणसिंग यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, मानपत्र, सन्मानचिन्ह व रोख रु.दहा हजार देवून प्रदान करण्यातआला. यावेळी उपाध्यक्ष प्रकाश कदम,सचिव विरसिंह रणसिंग,विश्वस्त कुलदीप हेगडे,विश्वस्त शंकरराव रणसिंग,माजी कार्यालयीन अधीक्षक शिवाजीराव कदम ,प्रा.डॉ.अशोक काळंगे ,प्राचार्य डॉ.विजय केसकर,उपप्राचार्य ज्ञानेश्वर गुळीग इ मान्यवर उपस्थित होते. विश्वास गौरव पुरस्कार इंदापूर तालुक्याचे माजी पंचायत समिती सभापती व पुणे जिल्हा



परिषद सदस्य तसेच इंदापूर तालूका ग्रामविकास प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष कै. विश्वासराव रणसिंग यांच्या २५ जुलै या जयंती दिवशी समाजातील कार्यसंपन्न व्यक्तींना प्रदान करण्यात येत असल्याचे सचिव विरसिंह रणसिंग यांनी सांगितले.दरवर्षी विश्वास पुरस्कार दिला जात असून मातीशी नाळ व सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या डॉ वसंत भगवान दगडे यांना सन्मानित करण्याचे सदभाग्य मिळाले असल्याचे सचिव विरसिंह रणसिंग यांनी सांगितले. यावेळी डॉ वसंत दगडे यांनी स्वर्गीय विश्वासराव दादा यांच्या आठवणीना उजाळा दिला.दादानी राजकारणासोबत सामाजिक जाणीव ठेवून केलेल्या कार्याचाआनंद व्यक्त केला. आयुष्यात माणसे जोडणे गरजेचे असल्याची शिक्षण अशिक्षित असणाऱ्या आईने दिली असल्याची आठवण त्यांनी सांगितली. आज या गोष्टींची गरज असल्याचे निरीक्षण ऑक्सफर्ड सारख्या विद्यापीठाने नोंदवले असल्याचे सांगितले. .स्वर्गीय विश्वासराव रणसिंग यांच्या जयंती च्या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.संस्थेचे कळंब येथील विश्वासराव रणसिंग महाविद्यालयात संगणक कक्षाचे उद्घाटन आनंदी रणसिंग यांच्या हस्ते करण्यात आले.एम एस्सी केमिस्ट्री प्रयोगशाळाचे उद्घाटन विश्वस्त कुलदीप हेगडे यांच्या हस्ते करण्यात आले.क्रिडामंत्री दत्तात्रय भरणे यांच्या माध्यमातून महाविद्यालयास ९० लक्ष रु चे बंदिस्त प्रेक्षागृह मंजूर झाले असून त्यांचे भूमीपूजन सचिव विरसिंह रणसिंग यांच्या हस्ते करण्यात आले. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत वृक्षारोपण करण्यासाठी उपाध्यक्ष प्रकाश कदम यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना रोपे वाटप करण्यात आली.महाविद्यालयाच्या वतीने ५०० रोपे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.संस्था संचलित माध्यमिक विद्यालय तावशी व माध्यमिक विद्यालय म्हसोबाचीवाडी येथे चित्रकला,निबंधस्पर्धा ,वृक्षारोपण,खाऊ वाटप इ उपक्रम घेण्यात आले. विश्वास गौरव पुरस्कार कार्यक्रमाचे सन्मानपत्र वाचन प्रा.विद्या गुळीग यांनी केले.प्रास्ताविक प्राचार्य विजय केसकर व आभार प्रा.ज्ञानेश्वर गुळीग यांनी व्यक्त केले.निवदेन प्रा.अभिजीत शिंगाडे यांनी केले.

यावेळी,प्रा.प्रशांत शिंदे ,प्रा. सुहास भैरट,प्रा.राजेंद्रकुमार डांगे ,प्रा. विलास बुवा ,प्रा.रामचंद्र पाखरे,प्रा.ज्योत्स्ना गायकवाड ,प्रा.विनायक शिंदे ,प्रा. योगेश खरात ,प्रा. महादेव माळवे,प्रा.सुवर्णा बनसोडे, म्हसोबाची वाडी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रमोद भोग , व तावशी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक महादेव बागल इ मान्यवर व प्राध्यापक,प्राध्यापकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

## माहूर पोलिसांची अवैद्य धंद्याविरोधात धडक कारवाई

### जुगार अड्ड्यावर धाड आठ जणांना पकडले

### पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या पथका सोबत माहूर पोलिसांची संयुक्त कारवाई

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत :- सुभाष खडसे तालुका प्रतिनिधी**

पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या पथकासोबत माहूर पोलिसांना तालुक्यातील मौजे हडसनी येथे ताज पत्ते जुगाराचा अड्डा सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाल्याने पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी जुगार अड्यावर संयुक्तपणे धाड टाकून 8 जनावर गुन्हा दाखल करत मुद्देमाला सह रोख 2050 रुपये जप्त केल्याची घटना दि 26 7 2025 अर्ध्या रात्री 12.15 वाजता घडल्याने जुगार




अड्डे चालविणारे आणि जुगार खेळणाऱ्यात दहशत पसरली आहे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या आदेशाने अवैध धंद्याविरुद्ध कार्यवाह्या करण्यासाठी पथकाची स्थापना करण्यात आली असून सर्व प्रकारचे अवैध व्यवसाय करणाऱ्यावर जबर कारवाया करण्यात येत आहेत त्या अंतर्गत माहूरचे पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी माहूर तालुक्यातील अनेक दारूचे अड्डे उध्वस्त केले असून माहिती मिळताच दारू विकणाऱ्यावर धाडसी कारवाया करण्यात येत आहेत अनेक ठिकाणी गोपनीय माहिती द्वारे जुगार अड्डे चालत असल्याची माहिती मिळाल्याने ही कारवाई करण्यात आली असून अनेक ठिकाणी अवैध दारू विक्री आणि जुगार अड्ड्यांचे चे संचालन काही महिला द्वारे होत असल्याने माहूर पोलीसाकडून सतर्कता अंतर्गत वरिष्ठ कार्यालयाच्या पथकाला पाचारण करून कार्यवाही करत असल्याने अवैध धंदे करणाऱ्यात दहशत पसरली आहे माहूर तालुक्यात गेल्या महिन्याभरापासून पाऊस सुरू असून बिबट्या अस्वल सह इतर जंगली जनावरांची दहशत कायम असताना गुप्त माहिती मिळाल्याने माहूरचे पोलीस निरीक्षक गणेश कराड यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ कार्यालयाच्या पथकाने जीव धोक्यात घालत मोटरसायकल वरून मौजे हडसनी येथे भर पावसात रात्रीला जगजीवन शिंदे यांचे जनावरांचे कोठ्या मध्ये ताज पत्ते जुगार खेळत असल्याची गुप्त माहिती मिळाल्याने पोलीस उपनिरीक्षक संदीप अन्येबोईनवाड, पोलीस अधीक्षक पथकाचे पोलीस उपनिरीक्षक ए.वि.डाके पो का. सोनटक्के, अमोल राठोड यांनी सदर ठिकाणी जाऊन ताजपत्ते जुगार खेळणाऱ्यां 8 जणांना रंगेहात पकडले व त्यांच्यावर पोलीस ठाणे माहूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला तसेच जुगार खेळण्याचे साहित्य आणि 2050 रुपये जप्त करण्यात आले आहेत

## ज्योतीताई उगले जीवनगौरव पुरस्काराणे सन्मानित !!

महाराष्ट्र जीत

**कारंजा(लाड)** तालुका प्रतिनिधी:- गुरुदेव सेवा मंडळाचे वाशीम जिल्हा महिला सेवाधिकारी व मध्यवर्ती प्रतिनिधी सौ.ज्योतिताई दीपक उगले यांना नुकतेच पद्मश्री फौंडेशन नागपूर व रामकृष्ण हरी विश्व मानव मंदिर मोझरीचे वतीने राज्यस्तरीय श्री गुरुदेव जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार त्यांना श्री गुरुदेव यात्रा समिती द्वारे आयोजित पंढरपूर देवदर्शन यात्रेच्या वेळी मा.वेरुळकर गुरुजी,ह.भ.प.काळे महाराज,डॉ. संजय आदमाणे यांच्या उपस्थितीत देण्यात आला.सौ.ज्योतिताई उगले यांनी बारा वर्षापासून राष्ट्रसंतांच्या कार्याचा प्रचार आणि प्रसार केलेला आहे. तसेच गेल्या तीन वर्षात श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या 60 महिला शाखा निर्माण केलेले आहेत. त्यांनी आतापर्यंत अनेक महिला मेळाव्याचे आयोजन तसेच बाल शिबिरामध्ये मार्गदर्शन केले आहे. कुशल संघटन आणि वकृत्व कलेमुळे त्यांची जनमानसात ख्याती आहे. या पुरस्काराबद्दल गुरुदेव मंडळाचे जिल्हा सेवा अधिकारी सुनील दशमुखे,रामबकसजी डेंडूळे,गणेश गांजरे अ.भा.श्री. गुरुदेव सेवा मंडळ प्रसिद्धी प्रमुख विजय खंडार,दीपकराव उगले सीमाताई सातपुते,आशाताई व्यवहारे,प्रा. अनुप नांदगावकर,संतोष केळकर वाशिम जिल्ह्यातील श्री.गुरुदेव सेवा मंडळ महिला व पुरुष भजनी मंडळ इत्यादींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.असे वृत्त विजय खंडार यांनी कळविले...

